# अभिजित प्र.फडणीस

७, इ विंग, पूर्वा सोसायटी, सरस्वती शाळेजवळ, पाचपाखाडी, ठाणे (प) ४०० ६०२ फोन : २५४३२९९७,६५२८८९९७

आदरणीय बंधू भगिनी,

**विवाहनिमित्त वेदांचा उज्ज्वल संदेश**

आपणा सर्वांचीच वेदमातेवर प्रगाढ श्रध्दा आहे. म्हणूनच वेदविद्येच्या अभ्यासाला व प्रसाराला अत्यंत प्रतिकूल वातावरण असूनही अत्यंत श्रध्देने अनेक संस्कार व विधी आपण पार पाडतो. परिस्थितीच्या रेटयामुळे पुरोहित वर्ग पोटार्थी झाल्याने आपल्या विधींमध्ये संस्कारच लोपला आहे. त्यामुळे आपल्या विधींमधला मंगल अर्थ व हेतू याचा लाभ आपल्याला होत नाही. आपल्या विवाहातला संस्कार लोपून, तो एक समारंभ झाला आहे. विवाहाला येणा-या मंडळीना आपण नवदंपतीला आशीर्वाद द्यायला आलो आहेत याचेही भान राहात नाही आणि त्यामुळेच मंगलाष्टके सुरु असतानाही गप्पा मारणारे महाभाग आपल्याला दिसतात.

ही परिस्थिती आपण बदलू शकतो का ? निश्चित बदलू शकतो. आपणास एखाद्या विवाहाला बोलावले असता किंवा आपल्याच घरी कार्य असल्यास आपण सोबत जोडलेल्या वेदोक्त संदेशाचे वाचन करु शकता. परंतू अशा वाचनाबाबत नवदंपतीच्या वडिलधा-या माणसांना याबाबत कार्याच्या आधीच विश्वासात घेणं आवश्यक आहे. किंवा त्यांच्याच घरच्या कुणालातरी आपण वाचनाबद्दल प्रवृत्त करु शकता. हे वाचन यशस्वी होण्यासंबंधी अनुभव असा की विवाहविधी संपल्यावर स्वागतसमारंभाच्या आधी हया संदेशाचे वाचन नवदंपतीला उपस्थितांच्या सम्मुख बसवून आणि घरच्या महत्वाच्या वडीलधारी मंडळीना त्यांच्या बाजूस बसवून केले तर ते अतिशय परिणामकारक होते. तसेच फोटोग्राफर्स, व्हिडिओग्राफर्स यांना पूर्वसूचना देऊन व पुरोहितांना विश्वासात घेऊन हे वाचन केले असता कुठलाही व्यत्यय त्यात येत नाही.

आपण कार्यामध्ये एवढी आनंदाची, वेळेची व खर्चाची गुंतवणूक करतो. त्याबरोबरच ही तीन ते चार मिनिटांची गुंतवणूक आपल्या समारंभाची उंची वाढवेल व नवदंपतीला सन्मार्गाला प्रवृत्त करेल.

हया उज्ज्वल संदेशाचे वाचन आपण कराल व इतरांना करण्यास प्रवृत्त कराल असा विश्वास.

**॥ श्री ॥**

**विवाहसंस्कारार्थ पवित्र वेदांचा उज्ज्वल उपदेश**

चि. ———————- व चि.सौ. ———————- च्या विवाहप्रसंगी ———— व ————- परिवारांतर्फे आपणा सर्वांचं स्वागत. आज त्यांचा विवाह वैदिक पध्दतीने उत्तमरित्या पार पडला आहे. आपणास माहित आहेच कि आपल्याकडे विवाह हा नुसता समारंभ किंवा करार नसून संस्कार आहे. वेद म्हणजे ईश्वराकडून तपस्वी ऋषिंना लाभलेलं ज्ञान. सृष्टीच्या उत्पत्तिकालीचा ईश्वराचा निःश्वास. सृष्टीचे सर्व नियम यात सामावले आहेत. वेदमंत्रांच्या उच्चाराने संस्कार घडतीच, पण संस्काराचा खरा हेतू आपल्यामध्ये असलेल्या ईश्वराचे जागरण. आज पार पडलेल्या अनेक विधींच्या माध्यमातून नवदंपतीने घरातील वडिलधा-या मंडळींच्या मदतीने गृहस्थाश्रमाची जबाबदारी कशी पार पाडावी याचे मार्गदर्शन वेदांनी केले आहे.

वधूपित्याच्या माध्यमातून ऋग्वेद आशीर्वाद देतात की माझी कन्या आज पतिगृही जात आहे त्या घराशी ती एकरुप होवो आणि त्या घराचा अविभाज्य भाग बनो. ऋग्वेद म्हणतो ज्या घरामध्ये आई वडिलांचा मान राखला जातो त्या घरामध्ये आनंद सदा वास करतो आणि हा सर्वशक्तिमान ईश्वर प्रेमस्वरुपाने नवदंपतीच्या मनामध्ये वास करुन राहातो.

आपल्या प्रत्येक विधीमध्ये मंगल अर्थ सामावला आहे. उदा. ध्रुवपूजन. ध्रुवतारा जसा स्थिर आहे तसाच संसार स्थिर व्हावा अशी ध्रुवपूजनामागची कल्पना आहे. अथर्ववेदाच्या माध्यमातून नवदंपती प्रार्थना करते कि आमचा एकमेकांकडे पहायचा दृष्टिकोन प्रेम आणि स्नेहपूर्ण असो. कुठल्याही प्रकाराचा द्वेषभाव आमच्या मनात नसो, आणि एकच आत्मभाव आम्हा दोघांमध्ये वसो. अथर्ववेद पुढे सांगतो की तुम्हा उभयता पतिपत्नीची एकमेकांपासून कधीही ताटातूट न होता पुत्र व पौत्रांसह संपन्न जीवन जगा. त्याचबरोबर कर्तव्यबुध्दी व न्यायबुध्दी जागृत ठेवून जगण्याची आज्ञा तपस्वी ऋषी नवदंपतीला देत आहेत. अथर्ववेद नववधूला सांगतात की तुझ्या नव्या घरातील सर्वांची विचारपूस तू कर आणि त्यांच्या सुख–दुःखात सहभागी हो. पुढे ऋषी म्हणतात की उत्तम बुध्दिमत्ता व समज असलेल्या हे नववधू, निकोप व सुदृढ जीवनासाठी निसर्ग नियमांचे तू पालन कर. अथर्ववेद नवरदेवाला आज्ञा करतो की वैवाहिक बंधनाचे पावित्र्य त्याने पाळावे, तसेच

नवरदेवाच्या घरच्या वडिलधा-या मंडळींना नववधूला घरचे सम्राज्ञीपद बहाल करावं अशी आज्ञाही देतात. अथर्ववेद नवदंपतीला ईश्वरावर निष्ठा ठेवण्याची आज्ञा करतो आणि असं आश्वासन देतो की ईश्वर आपलं नातं अतूट ठेवेल.

यजुर्वेद नवदंपतीला दिव्य संदेश देतात. सुजाणपणे, परोपकार बुध्दी जागृत ठेवून त्यागमय जीवन जगा. यजुर्वेद-द्रष्टे ऋषी म्हणतात कि आपली सदसद्विवेक बुध्दी व आत्मिक स्पंदने जपत, वैदिक आदर्शांप्रमाणे जगा व इतरांना जगण्यास प्रवृत्त करा. पितरांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी उत्तम संतती उत्पन्न करा आणि त्यांना वैदिक जीवनमूल्यांविषयी जागृत करा.

सामवेद द्रष्टे ऋषी नवदंपतीला समाजविषयक कर्तव्यांची जाणीव करुन देतात. उदारता, दानशूरता व परोपकार आपल्या अंगी बाणविण्यासाठी प्रवृत्त करतात.

संकल्प, गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदीश्राध्द, मंडपदेवता प्रतिष्ठा, मधूपर्क, गौरीहरपूजन, कन्यादान, सूत्रवेष्टन, मंगलसूत्रबंधन, विवाहहोम हे सर्वच विधी ईश्वरदयेने उत्तम पार पडले आहेत (किंवा पार पडणार आहेत), आपल्या सर्वांच्या उपस्थितीने समारंभाची शोभा वाढली आहे. आपणा सर्वांचे उभय परिवारांतर्फे आभार, अग्निदेवतेच्या साक्षीने नवदंपतीने गृहस्थाश्रमाला सुरुवात केली आहे. ईश्वरकृपेने नवदंपती आपला गृहस्थाश्रमधर्म उत्तमरित्या पार पाडोत असा आशीर्वाद आपण द्यावा ही प्रार्थना.

धन्यवाद

**(वरील वेदोपदेश आपणास आवडला असल्यास आपण याचे विवाह समारंभात अवश्य वाचन व वितरण करा)**

**संकलक आणि समाजकल्याणार्थ प्रसारकः**

**अभिजित फडणीस,**
**७,इ विंग, पूर्वा सोसायटी,**
**सरस्वती इंग्रजी शाळेजवळ, पाचपाखाडी**
**ठाणे (पश्चिम ) ४०० ६०२ दूरध्वनी (०२२) २५४३२९९७**